# रेन्बो बी आर टी एस चा एक महिना पूर्ण

पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका व पी एम पी एम एल यांनी रेन्बो (इंद्रधनुष्य) बी आर टी एस हा सार्वजनिक वाहतूक सुधारण्याच्या दृष्टीने कार्यान्वित केलेला स्मार्ट प्रकल्प सुरु होऊन एक महिना पूर्ण झाला आहे. या प्रकल्पातील पहिला टप्पा असलेला संगमवाडी - विश्रांतवाडी मार्ग ३० ऑगस्ट २०१५ रोजी सुरु झाला व या मार्गाचा एक महिन्याचा प्रवास एक शाबासकीची थाप देऊन गेला त्याच बरोबर काही मौलिक धडे शिकवून गेल. शहरातील रहदारी सुधारणे व जीवनमान उंचावणे या प्रयत्नातील हा एक महत्वाचा टप्पा तर आहेच व त्याच बरोबर बस ने प्रवास करणार्यांना प्राधान्य व प्रतिष्ठा मिळवून देणारा हा महत्वाचा प्रकल्प सिद्ध होत आहे. उच्च दर्ज्याचे बस स्टेशन, सामापातालीवरून बस मध्ये येजा, बस चा वाढलेला वेग व वारंवारिता व माहिती यंत्रणा ही रेन्बो बी आर टी ची अनुभव घेण्यासारखी वैशिष्ठ्ये आहेत.

"या एक महिन्याच्या प्रवासात आम्हाला email, website (संकेतस्थळ), facebook व लोकांच्या प्रत्यक्श्य सूचनांमधून बरेच अभिप्राय प्राप्त झाले असून या यंत्रणेचा विस्तार इतर मार्गांवर ही करण्याची मागणी होत, आहे हा अतिशय सकारात्मक संकेत आहे" असे म्हणाले श्री अभिषेक कृष्णा (भा प्र से), मुख्य व्यास्थापाकीय संचालक, पी एम पी एम एल

पी एम पी एम एल व महानगरपालिकेचे कौतुक करणारे व त्याच बरोबर काही मौलिक सूचना करणारे, त्रुटी दाखवून देणारे अभिप्राय प्राप्त झाले असून या सगळ्याचा सारासार विचार व कारवाई करण्याचे काम महानगरपालिका, पी एम पी एम एल, ट्राफिक पोलिस करत आहेत. विश्रांतवाडी चौकात होणारी गर्दी, बस मार्गातील बदल, काही बंद केलेले लहान चौक या पासून ते बस चालकाची स्टेशनशी बस संरेखीत न करता येणे, बस मधील स्वयंचलित दरवाजे न उघडणे / बंद होणे, बस व स्टेशन मधील माहिती यंत्रणा न चालणे, सिग्नल काम न करणे अश्या प्रकारचे अभिप्राय प्राप्त झाले. आलेले अभिप्राय व सूचनांची दररोज नोंद होते व त्यावर संबंधित खात्यांशी चर्चा होऊन त्यावर योग्यती कार्यवाही करण्यात येते.

नागरिकांनी व संबंधित नगरसेवकांनी केलेल्या सूचनांचा अभ्यास करून केलेल्या काही मुख्य सुधारणा अश्या आहेत -

- आळंदीला जाणऱ्या थेट बसेस पून्हा सुरु केल्या व प्रवाश्यांची गैरसोय कमी झाली
- महत्वाच्या चौकातील अतिक्रमणे हटवून , पार्किंग वर नियंत्रण आणून व काही स्पीड ब्रेकर काढून वाहतूक प्रवाहात सुधारणा
- प्रतीक नगर येथे बंद केलेला रस्ता , रस्ता ओलांडणाऱ्या पादचार्यान करिता खुला करणे
- सिग्नल यंत्रणेत वेळेचे नियंत्रण व समक्रमण करणे

ह्या पहिल्या महिन्यात केलेय सुधारणा असून येणाऱ्या काळात बी आर टी एस चा प्रयास अधिक सोईस्कर करण्यासाठी व सार्वजनिक वाहतूक संस्कृती निर्माण करण्यासाठी अजून काही सुधारणा केल्या जातील. दुसर्या टप्यात पुण्यातील येरवडा ते वाघोली (नगर रस्ता) व पिंपरी चिंचवड येथील नाशिक फाटा ते वाकड हे बी आर टी एस मार्ग सुरु करण्यात येणार आहेत ज्या मुळे बस प्रवास अधिक सोईस्कर होईल अशी खात्री आहे. "आम्ही प्रवाश्यांचे व सर्व नागरिकांचे एम पी एम एल तर्फे आभार मानतो. आलेल्या सूचनांचे आम्ही स्वागत करतो कारण आम्ही बी आर टी एस सेवा सतत सुधारण्यासाठी कटीबद्ध आहोत. दोन्ही महानगरपालिका व ट्राफिक पोलिस यांच्या सहकार्यासाठी आभारी आहोत व त्यांच्या समर्थनाची अपेक्षा बाळगतो" असे श्री अभिषेक कृष्णा म्हणतात.

**रेन्बो (इंद्रधनुष्य) बी आर टी एस ला www.RainbowBRT.in आणि Facebook.com/RainbowBRTS संकेतस्थळावरून प्राप्त झालेले काही कौतुकास्पद अभिप्राय** -

- बीआर टी ने जर उत्तम सेवा व वेळेत पोहोचविले तर माझ्यासारखे अनेक प्रवासी स्वतंत्र गाडीने प्रवास करण्यापेक्षा brt नेच प्रवास करण्यास पहिली पसंती देतील. आशा आहे ज्या धडाडीने brt ची कामे चालु आहेत त्याच धडाडीने सेवा ही देतील. brt ला शुभेच्छा (गजानन अवचट)
- धन्यवाद, BRT सुरु करण्याचा निर्णय अतिशय स्तुत्य आहे. याचं यशस्वी होण केवळ पुणे आणि पींपरी चिंचवड करांवरच् अवलंबुन आहे. चला याला यशस्वी करुया आणि आपला traffice चा problem सोडवुया (महेश कालेकर)
- दुसर्या दिवशीही ३५ मिनिटात घरी पोचलो जिथे आधी  ४५-५५ मिनिटे लागत होती. रेन्बो बी आर टी मुळे लोकं खासगी वाहने सोडून बस नी प्रवास करतील अशी खात्री वाटते. (त्रिशुल पालेकर)
- रेन्बो बी आर टी चा प्रवास मस्त अनुभव. जरा उशीर झाला पण देशाच्या विकासाच्या दृष्टीने स्तुत्य उपक्रम. प्रशासनाचे धन्यवाद (राहुल सावंत)
- पुण्यासारख्या दररोज वाढणाऱ्या शहराला एक प्रवासीभिमुख व खात्रीशीर सार्वजनीक वाहतूक व्यस्था असणे अती गरजेचे आहे. आपली सार्वजनिक वाहतूक सुधारण्याच्या दृष्टीने रेन्बो बस ला बी आर टी एस हा अतिशय गुणकारी उपक्रम आहे. हा प्रकल्प भविष्यातील वाहतुकीचा पाया रचेल अशी आशा आहे. (विनय रामबल)

पी एम पी एम एल ला बी आर टी एस सेवेत मदत पुरविण्यासाठी काही स्वयंसेवक पुढे येत आहेत. इच्छुक नागरिक संकेतस्थळावरून व facebook वरून संपर्क साधू शकतात.

**संगमवाडी - विश्रांतवाडी मार्गावरील पहिल्या महिन्यातील** (सेप्टेम्बर २०१५) **सरासरी प्रवासी संख्या पुढील प्रमाणे आहे**

संपूर्ण महिन्यातील एकूण प्रवासी संख्या (अंदाजे) = 9,77,594

प्रती दिन सरासरी (अंदाजे) = 37,162

**बी आर टी सुरुहोण्या पूर्वी प्रवासी संख्या, ऑगस्ट २०१५**

संपूर्ण महिन्यातील एकूण प्रवासी संख्या = 5,78150

प्रती दिन सरासरी = 18,650

**श्री कुणाल कुमार (भा प्र से) पुणे महानगरपालिका आयुक्त**

इंद्रधनुष्य (रेन्बो) बी आर टी एस ने रोज प्रवास करणाऱ्या, अभिप्राय देणाऱ्या व हि सेवा यशस्वी होण्यासाठी सहकार्य / समर्थन करणाऱ्या प्रत्येक नागरिकाचे आम्ही आभार मानतो. आम्ही आलेल्या सूचनांवर काम करत आहोत व या अनुभवाचा नगर रस्त्यावरील बी आर टी एस विकसित करण्यात उपयोग होइल जी लवकरच सुरु करण्यात येईल.

पी एम पी एम एल ची कार्यशमता वाढविणे, प्रशिक्षित मानव संसाधन घडविणे व तांत्रिक विकास साधण्यासाठी लागणारा आर्थिक आधार देण्यासाठी आम्ही कटीबद्ध आहोत. पी एम पी एम एल ने आव्हान स्वीकारल्याबद्दल त्यांचे कौतुक आहे व इंद्रधनुष्य (रेन्बो) बी आर टी एस शहर पातळीवर यशस्वी करण्यासाठी आम्ही एकत्र आहोत. आम्हाला बी आर टी एस सेवेचा अभिमान आहे व त्याकडे आम्ही भविष्यातील रहदारीचा उत्तम पर्याय म्हणून बघतो.

**पत्रकार संपर्क - सौ मयुरा शिंदेकर (मुख्य कार्यकारी अधिकारी), पीएमपी बी आर टी विभाग. दूरध्वनी - 7774003336**